जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८९८ दिनांक - २५/१२/२०२३**

चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

# अतिश उमेश डिंगरे,(टोळी प्रमुख) व त्याचे ०५ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई

दि.१३/११/२०२३ रोजी यातील फिर्यादी हे सत्यम सेरेनिटी सोसायटी, माळवाडी वडगाव शेरी पुणे येथे रात्रपाळी सिक्युरीटीची ड्युटी करीत असताना दोन मोटार सायकलवर ६ अनोळखी इसम अंदाजे वय २० ते २२ वर्ष सत्यम सेरेनिटी सोसायटी माळवाडी, वडगावशेरी पुणे येथे येवून मोठ-मोठ्याने आरडा ओरडा करत असल्याने तेव्हा फिर्यादी यांनी तुम्ही सोसायटीच्या समोर का आरडा-ओरडा करत आहात. असे म्हणाले असता त्यावेळी त्यांनी तुला माहित नाही का, आम्ही वडगाव शेरीचे भाई आहोत. तु आम्हांला बोलतो का ? असे म्हणून त्याने फिर्यादी यांचा जीव घेण्याच्या उद्देशाने केबीनच्या व सोसायटीचा साईन बोर्ड दगडाने फोडून हातातील लोखंडी हत्यार हवेत फिरवून तेथील रहिवासी यांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण करून, सदर आजूबाजूचे परिसरातील रोडवर पार्क केलेल्या वाहनांची तोड फोड करून अंदाजे ९५,५००/- रु. रक्कमेचे नुकसान केले आहे. म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून चंदननगर पोलीस स्टेशन गु.रजि.नं.५३४/२०२३, भा.दं.वि. कलम ३०८,४२७, १४३, १४७ १४८,१४९, क्रि लॉ. अॅ. अॅक्ट ३ व ७, आर्म अॅक्ट ४(२५) म.पो.अ.कलम ३७(१)(३)सह १३५ वरील कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

दाखल गुन्ह्याचे तपासा दरम्यान **१)अतिश उमेश डिंगरे,वय २३ वर्षे, रा.दिपक चौपाटी, जत्रा मैदानाचे जवळ, ता वणी जि यवतमाळ (टोळी प्रमुख), २)स्वप्निल गोवर्धन ओव्हाळ,वय २२ वर्षे,रा.डुक्कर गल्ली जवळ, वडगावशेरी पुणे,३)कुणाल महेंद्र परिहार,वय २० वर्षे,रा. गणेशनगर,वडगावशेरी पुणे ४) आकाश हरिश्चंद्र पायगुडे,वय २२ वर्षे,रा.कलवड वस्ती,लोहगाव पुणे. ५)अजय राम घनघाव,वय २३ वर्षे,रा.धानोरी विश्रांतवाडी,पुणे, ६) आदित्य संदेश कांबळे, वय २१ वर्षे, रा.वडगांवशेरी, भाजी मंडईजवळ, पुणे** अन.नं.१ व ५ यांना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.

नमुद आरोपी अतिश उमेश डिंगरे, (टोळी प्रमुख) व त्याचे इतर साथीदार यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी तयार केली असुन, सदर टोळीने मागील १० वर्षात खुनाचा प्रयत्न करणे, जबरी चोरी करणे, सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न करणे, मालमत्तेचे नुकसान करणे, गंभीर दुखापत करणे, बेकायदेशीर जमाव जमविणे, बेकायदेशीररित्या हत्यारे बाळगुन दहशत निर्माण करणे इत्यादी प्रकारचे गुन्हे केल्याचे निदर्शनास आले आहे. सदरचे गुन्हे हे अवैध मार्गाने स्वतःसाठी व इतरांसाठी गैरवाजवी आर्थिक फायदा व इतर फायदा मिळविण्यासाठी, टोळीचे वर्चस्वासाठी व दहशत कायम ठेवण्यासाठी तसेच नागरीकांच्या मनात भिती निर्माण करण्यासाठी सातत्याने चालु ठेवल्याचे निष्पन्न होत आहे. यापुर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत.

यातील नमुद आरोपी यांनी संघटितपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे आर्थिक फायदयासाठी प्रस्तुत गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने व दाखल गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे ३(१)(ii),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करणेकामी चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राजेंद्र लांडगे, यांनी मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-४, पुणे शहर, श्री शशिकांत बोराटे, यांच्या मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन चंदननगर पोलीस स्टेशन गु.रजि.नं.५३४/२०२३, भा.दं.वि. कलम ३०८,४२७,१४३,१४७,१४८,१४९, क्रि.लॉ.ॲ.ॲक्ट ३ व ७, आर्म ॲक्ट ४(२५) म.पो.अ.कलम ३७(१)(३)सह १३५ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे ३(१)(ii),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त, येरवडा विभाग, पुणे शहर, श्री संजय पाटील हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री.रितेश कुमार,मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा,पुणे,(पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार) श्री.रामनाथ पोकळे मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे श्री.रंजनकुमार शर्मा मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-४, श्री शशिकांत बोराटे, मा.सहा. पोलीस आयुक्त, खडकी विभाग, पुणे शहर श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली चंदननगर पोलीस स्टेशनचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री राजेंद्र लांडगे, पोलीस निरीक्षक, (गुन्हे) श्रीमती मनिषा पाटील, पोलीस उप निरीक्षक दिलीप पालवे, संजय गायकवाड, पोलीस अंमलदार राजेश नवले, रामचंद्र गुरव, पंकज मुसळे, नाना पतुरे, गणेश आव्हाळे, अनुप सांगळे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईन लक्ष देवुन,शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही १०६ वी कारवाई आहे.**